# आदिम कलेचा वारसा 'गोंदण' : एक ऐतिहासिक दृष्टीकोन

डॉ. रामकुमार प्रधान
इतिहास विभाग
एसएनडीटी कला व एससीबी वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय मुंबई.

मानवी त्वचेवरील गोंदण हे सौंदर्य, सांस्कृतिक ओळख, औषध, स्थान, सायको-सामाजिक, सामाजिक-सांस्कृतिक संकल्पना समजून संवाद साधण्याचे माध्यम आहे. ज्ञान प्रसार प्रणालीमध्ये आदिवासीची संस्कृती अंकित करणारी व्हिजुअल भाषा आहे. मानवी इतिहासात डोकावून पाहिले असता गोंदण हे आदिवासींची संस्कृती जतन (प्रसारित) करणारा एक वारसा आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृती स्थलांतराचा मार्ग आहे.

संपूर्ण जगाचा विचार करीत असताना कलेची सुरुवात आदिवासी जमातीमध्ये झाली असे दिसते. ज्या काळात कला किंवा कलाकार हि संकल्पना अस्तित्वात नव्हती त्या काळात आदिवासी लोकांनी कलात्मक व सौंदर्याचा उत्तम नमुना म्हणून गोंदण संपूर्ण जगाला देणगी दिली आहे. आदिवासींच्या मुळभाषे बरोबर गोंदण सामाजिक समूहाला एकात्मतेत बांधून ठेवण्याचे काम करीत होते. धार्मिक जीवन, संस्कृती, कुळ, रूढी, परंपरा, सामजिक मूल्य त्यांच्या त्वचेवर पहावयास मिळते. आदिवासी जमातीमध्ये त्वचेवरील गोंदण हे अभिमानाचे प्रभावी साधन आहे. ते अगधी बरोबर आहे, कारण ते पूर्वजांनी सांगितलेली परंपरा आहे. आपले पूर्वज देव, आत्मा, यांचे चिन्ह असलेले गोंदण आदिवासी जमातीच्या एकतेचे व वंशावळीचे संरक्षण करण्याचे प्रतिक मानले जाते.

त्वचा हे कलेचे प्रथम कॅनवास होते. तर काळ्या व इतर टोकदार वस्तू पहिले ब्रश होते. गोंदण काढण्यासाठी टोकदार वस्तू त्वचेवर टोचणे हा पहिला प्रकार होता. गोंदण तयार करताना झालेली जखम भरून निघण्यासाठी राखेचा वापर करून ती जखम कायम स्वरूपी भरून काढली जात होती. इतिहासपूर्व काळातील आदिम मानव अग्नीमध्ये काठी जाळून त्याद्वारे कातळी कट करीत असत व जखमेवर काळा पदार्थ लावून गोंदण चिन्ह तयार करीत असत असा विश्वास होता. प्राचीन काळातील आदिम मानवाने गोंदून घेण्याची प्रक्रिया करीत असताना अग्नीपासून होणारी वेदना, रक्त इत्यादी सहन केले आहे, कारण त्यांचा पवित्र जीवनावर विश्वास होता. रक्त देणे हे निसर्गादेवातांशी संबंधित होते. गोंदण काढत असताना प्राण्यांचे चिन्ह हे प्राणी हल्यापासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठीचे प्रतिक होते. मृत्यू नंतर आत्म्यांपासून संरक्षण करण्यासाठी चित्र रेखाटण्याची

पध्दत होती. देवतांच्या नावाने गोंदवून घेणे हा उद्देश होता. आदिम मानव टोळी-टोळीने रहात असताना, एखाद्या टोळीच्या सरदाराचा मृत्यू झाल्यास टोळीचा सरदार आपल्यावर वाईट दिवस आणेल, त्यापासून सुटका होण्यासाठी भिन्न भिन्न प्रकारे चिन्ह गोंदवून घेण्याची प्रथा होती. इतिहासपूर्व काळातील आदिवासी लोक त्वचेवर गोंदवूनघेण्यात गुंतली होती हा पुरातत्वीय पुरावा आहे. अश्मयुगातील कृत्रिम गोंदण हे मानवजातीला फार जुने आहे. निरनिराळ्या वन्य जमातीत भूत्खेतांपासून स्वत:चे संरक्षण व्हावे म्हणून कपाळावर, हातावर व शरीराच्या अन्य अवयावर सांकेतिक चिन्ह काढण्याचा प्रघात होता. यातून गोंदण रूढ झाले असावे.

**दहन कला** : दहन करून गोंदणे हि प्राचीन इतिहासातील दहन कला आहे. आत्मा एक अदृश्य शक्ती आहे, ती मानवी शरीरात वास करते असे प्राचीन लोकांचा समज होता. आधुनिक काळातही शरीरासंबंधीचा गूढवादि विश्वास समान आहे. वाईट गोष्टी आत्म्यात वास करतात त्यापासून परावृत्त करण्यासाठी गोंदणे चालू केले आहे असा विश्वास आहे.

**कुळ चिन्ह** : आदिवासी जमाती गोंदण काढताना ज्या चिन्हाचा वापर करीत होते त्यास कुळचिन्ह असेही म्हणतात. प्राण्यांचा कुळ चिन्ह म्हणून सामान्यता गोंदून घेण्यासाठी वापर होत असे. यामध्ये अस्वल, बेडूक, साप, फुलपाखरे, या सारख्या प्राण्यांचा व पक्षांचा वैक्तिकरित्या शारीरिक पराक्रम म्हणून वापर केला जात होता. आध्यात्मिक विचार दर्शविण्यासाठी मार्गदर्शक म्हणून हे कुळ चिन्ह गोंदून घेत होते. लढाई दरम्यान किंवा एखाद्या हल्ल्याच्या वेळी शत्रूंपासून मित्रांना ओळखण्यासाठी या चिन्हाचा वापर होत असे. या शिवाय एखाद्या मित्राचा मृत्यू झाल्यास आपल्या मित्राशी स्वर्गात चांगले वर्तन करता येतो असाही समज होता. दुसरे असे कि आपल्या कुटुंबातील नाते संबंध असलेली व्यक्ती कुठेही मृत्यू पावली तर त्यास ओळखता येणे हे होय.

**संस्कार चिन्ह** : आदिवासी जमातीमध्ये पौगंडावस्थेत मुलांना गोंदून घेण्याची प्रथा होती. मुलगा गोंदून घेत असताना वेदना सहन करीत नसेल तर तो युध्दासाठी निरुपयोगी आहे, असे समजले जाई. तसेच मुलगी वेदना सहन करीत असेल, तर तिला बाळंतपण करताना त्रास होणार नाही असे समजले जात असे. ज्यांना गोंदून घेताना वेदना सहन होत नाही त्यांना कमकुवत आहे, असे समजले जात होते.

आदिवासी स्त्रियांमध्ये गोंदण हे प्रिय आभूषण आहे. त्यांचा असा विश्वास होता कि, गोंदणविना त्यांचे जीवन अपुरे आहे. गोंदनामुळे त्यांचे सौंदर्य फुलून दिसते. जी युवती गोंदवत नाही, तिला आदिवासी समाजात ल्ल्जीत व्हावे लागते. म्हणूनच गोंदण त्यांच्याकरिता असे आभूषण होते कि, मरणोपरांत सोबत रहात असते. शरीरावर गोंदवून घेतल्यामुळे युवकाची (प्रेमी ) नजर त्यांच्यावर असते, असा त्यांचा विश्वास आहे. गोटुलातील प्रेमिका कपाळ, छाती, मंगट, बा हु,

हात, हाताची व पायाची बोटे इत्यादी भागावर गोंदून घेत असे. मौल्यवान आभूषण न वापरता केवळ गोंदण आभूषणानी आपली इच्छा पूर्ण करीत असतात. हलबी जमातीत सुध्दा गोंदण्याची प्रथा प्रचलित आहे. लग्नसमारंभाच्या वेळी गोंदवून घेण्यास विशेष महत्व असते. हे हलबी जमातीचे खास वैशिष्टये आहे. लग्नानंतर मुलगी आईवडीलाकडून सासरी जाण्यापूर्वी तिचे अंग मुद्दाम गोंदून घेतात. मुलगी आईवडिलांना विसरू नये हा त्यामागील उद्देश असतो. हलबा जमातीमधील स्त्रियांच्या हातावर, गालावर, चेहऱ्यावर व कपाळावर गोंदलेले असते .१०४

गोंड व माडिया गोंड जमातीमधील स्त्रिया अंगावर गोंदून घेणे, हे एक मानाचे लक्षण समजले जाते. आपले शरीर अधिक आकर्षक दिसावे, असाही त्यामध्ये एक दृष्टीकोन असतो. प्रत्येक स्त्री आपल्या तरुण वयातच गोंदून घेते. त्यांच्या हातापायावर, दोन्हीबाहुंवर, कंबरेवर, छातीवर, नाक सोडून संपूर्ण तोंडावर भरपूर गोंदून घेतले असते. त्यात ठिपके, लहान उभे-आडवे पट्टे, झाडे, प्राणी, पक्षी यांच्या नक्षी असतात. गोंदून घेण्यासाठी 'घेलवा' तेलाचा व कोळशाचा वापर करतात. प्रत्यक्ष गोंद्ताना 'घेलवा' तेलाचा व गोंदल्यानंतर रंग उठून दिसण्यासाठी कोळशाचा उपयोग करतात. गोंदण्यासाठी सायटस काटयांचा उपयोग करतात.८०

ठाकूर स्त्रियांबरोबर पुरुषही गोंदून घेतात. साधारणता मुली आठ ते बारा वर्षाची असताना गोंदून घेतात तर काही ठिकाणी उशिरा गोंदून घेण्याची प्रथा आहे. कवर जमातीमधील स्त्रिया छातीवर व हातापायावर गोंदून घेतात . एखादी स्त्री कवर आहे कि गोंड हे तिच्या गोंदणावरून ओळखता येते.

आज गोंदण लोकप्रिय झाले आहे. आदिवासी जमाती मधील वाघ, ड्रगण या सारख्या गोंदना मधील डिझाईनसनी युवावर्गात लोकप्रियता मिळवली आहे. गुगलवरील Indian tattoos या सदराखाली आदिवासी गोंदणामधील प्रतीकात्मक चिन्ह व काळ्या रंगाचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला दिसून येतो. अनेक लोक भारतीय गोंदण मिळविण्याच्या प्रयत्नात असतात. आदिवासी जमातीमधील अतिशय सुंदर व शक्तिशाली गोंदण डिझाईनस मिळविणे हाच दृष्टीकोन असतो, कारण अनेक भारतीय आदिवासी जमातीची गोंदण कला हि परंपरा आहे. अनेक तरुण लोक त्यांच्या पूर्वजांना शोधात आहेत, जे भारतीय आदिम वंशातील भाग होते आणि त्या वंशाचे प्रतिनिधित्व भारतीय आदिवासींचे गोंदण करीत आहे. कारण गोंदण हे भारतीय आदिम जमातीचा वारसा आहे.

**संदर्भ :**

Murkute S. M., 1990, Socio-cultural Study of Scheduled Tribes: The Pardhans of Maharashtra, Concept Publishing Company Pvt. Ltd.p. 138

ISSN : P-2455-0515 E- 2394-8450

Mehata Prakash Chandra, 2007, Cultural Heritage of Indian Tribes, New Delhi Discovery publishing house.

Journal of the Anthropological survey of India, Vol. 61,No.1, Jan- June,2012,p.174

Von Fürer-Haimendorf, Christoph, 1982, *Tribes of India: The Struggle for Survival.* Berkeley, University of California Press, p.16, 17.

देवगावंकर शैलजा, १९८९, वैदर्भीय आदिवासी जीवन व संस्कृती, नागपूर, मंगेश प्रकाशन, पु. ९८

गारे गोविंद,२००२, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे, कॅनटीनेनटल प्रकाशन, पु.८०,१०४,१५४

http://www.geocities.com/tat2byjoe

www.tattooebook.org